# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/02/2024 (शनिवार) सायंकाळ

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक १७/०२/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे देवलापार हद्दीतील बेलदा नवेगाव रोडवर बेलदा येथे ट्रॅक्टर संलग्न ट्रॉली मध्ये अवैधरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून बेलदा नवेगाव रोडवर बेलदा येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नाकाबंदी केली असता नमुद घटनास्थळी **आरोपी नामे— गोविंद दौलत अवथरे वय ३५ वर्ष, रा. बेलदा ता. रामटेक फरार मालक आरोपी मंगेश भांडारकर रा. बेलदा ता. रामटेक** हे ट्रॅक्टरचे ट्रॉलीमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्यांच्या ताब्यातून ट्रॅक्टर व टाली किंमती ५,००,००० रु व १ ब्रास रेती किंमती २०००/—रू. असा एकूण ५,०२,०००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सदर प्रकरणी पो.स्टे. देवलापार येथे ट्रॅक्टर चालक व मालक फरार आरोपी याचेविरूद्ध अप. क्र. ४२/२०२४ कलम ३७९, १०९ भादंवी सहकलम ४८(८) महसूल अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनि. दिपक कांक्रेटवार पो.हवा रोशन काळे, शंकर मडावी, नितेश पिपरोदे, उमेश फुलबेल, प्रमोद भोयर, पोना विपीन गायधने, विरेंद्र नरड यांचे पथकाने पार पाडली.

## अवैधरीत्या देशी दारुची
## वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक १६/०२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरव्दारे माहिती मिळाली की, एक होंडा शाईन मोटरसायकलने दोन इसम कुहीवरून साळवा रोडने एका बॅगमध्ये दारूची अवैध वाहतूक होत आहे अशा माहितीवरून पांडेगाव समोरील रोडवर मोसा. एम.एच—४०/बी. आर—२८४० ने अवैद्यरित्या दारू वाहतूक करणाऱ्या दोन इसमांना नाकाबंदी केली असता **आरोपी नामे— १) संजय अशोक कांबळे, वय ३२ वर्ष, २) राजकुमार हरिभाऊ आंबिलडूके, वय ४२ वर्ष, रा. दोघेही राजोला** त्यांच्या जवळील बॅगमध्ये विनापरवाना व अवैधरीत्या देशी दारू संत्रा नं. १ च्या १८० एम. एल च्या २४ निपा प्रत्येकी ८० रू. प्रमाणे १९२०/—रू. तर देशी दारू प्रिमीयम नं. १ लेबल असलेल्या १८० एम. एल च्या २४ निपा प्रत्येकी ७० रू. प्रमाणे १६८० रू. व वाहतुकीसाठी वापरलेली होंडा कंपनीची मोसा. एम.एच—४०/बी. आर—२८४० किंमती अंदाजे ७०,०००/—रू. असा एकुण ७३६००/— रूपयाचा मुद्देमाल मिळून आला. यातील आरोपींना सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोना रोशन नारनवरे पोस्टे कुही यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपींविरुध्द कलम ६५ (अ), (ई) ८३ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग श्री. राजा पवार, पोस्टे कुही येथील ठाणेदार श्री. सपोनि अमितकुमार आत्राम, पोहवा ओमप्रकाश रेहपांडे, पोलीस नायक रोशन नारनवरे, पोलींस अंमलदार राहुल देविकर, महिला पोलीस हवालदार सुनिता भट यांनी पार पाडली.

## ऑनलाईन फसवणुकीतील रक्कम परत मिळविण्यास नागपूर ग्रामीण पोलीसांना आले यश

पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. बोरी अंतर्गत तक्रारदार नामे राधेमोहन सिंग रा. एम.आय.डी.सी. बोरी यांना टेलीग्राम वर पार्ट टाईम जॉब ची जाहीरात दिसल्याने तक्रारदारने सदर लिंकवर संपर्क केला असता. यांतील आरोपीने स्काय स्कॅनर नावाचे प्लॅटफार्मवर जोडुन तक्रारदारला टास्क दिले. सदर टास्क पुर्ण झाल्यावर त्याबदल्यात तुम्हाला पैसे देण्यात येतील असे सांगुन तक्रारदारला काही रक्कम गुंतवणुक करण्यास सांगीतले तक्रारदारने त्यावर विश्वास ठेवुन रक्कम गुंतवत गेला. असे करत १,२०,०००/– रूपयाची गुंतवणुक केली. त्याच प्रमाणे पोलीस स्टेशन उमरेड येथील हद्दीतील तक्रारदार नामे रेड्डी यांचे सोबत 10,48879/– रूपयाची फसवणुक केली. पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत तक्रारदार अचलेश पाल रा. कळमेश्वर या सोबत सुद्धा इन्वेस्टमेन्टच्या नावावर टेलीग्राम या प्लॅटफॉर्मला जोडुन 2,83,501/– रूपयाची फसवणुक करण्यात अली. तक्रारदारांचे लक्षात आले की, आपल्या सोबत फसवणुक होत आहे. या नंतर तक्रारदारांने NCCRP Portal वर ऑनलाईन तक्रार केली.

सदर तक्रारी सायबर पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण येथे प्राप्त होताच तपासाचे सुत्र हालवुन सदर तक्रारदारांचे पैसे कोणकोणत्या खात्यावर ट्रान्सपर झाले याची माहिती तात्काळ घेण्यात आली. व सायबर फ्रॉड मधील आरोपी पैसे लवकर विड्रॉल करतात याची माहिती असल्यामुळे ज्या खात्यावर पैसे ट्रान्सपर झाले आहे ते सर्व अकांउट डेबिट फ्रिज केले. त्यामुळे तक्रारदारचे पैसे आरोपीच्या खात्यामध्ये होल्ड झाले. त्यांनतर तक्रारदारांना बोलवुन कोर्टा मध्ये सदर रक्कम परत घेण्याबाबत योग्य मार्गदर्शन करून मा. कोर्ट नागपूर येथे पेसै परत घेणे करीता सुपूर्दनामा दाखल केला. मा. कोर्टाने कार्यवाही पूर्ण करून तक्रारदारांचे फसवणुक झालेली रक्कम परत करण्याचे आदेश पारित केल्यामुळे सदरची रक्कम अर्जदारांना मिळाली. यांमुळे तक्रारदारांनी नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, सायबर पोलीस स्टेशन व मा. न्यायलायाचे आभार मानलेत.

अशा फसवणुकी संबंधी मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रमीण यांनी जनतेला अव्हान केले आहे की, अशा फसवणुकीला बळी पडु नका, सतर्क राहा. कुठल्याही फेक फोन कॉल्सला, लोन ॲप, इन्वेस्टमेन्ट, जॉबच्या नावाव होत असलेल्या फसवणुक पासुन सावध राहा. आपल्या सोबत अशि फसवणुक झाल्यास ऑनलाईन cybercrime.gov.in तसेच १९३० यावर तात्काळ तक्रार नोंदवावी जेणे करून फसवणुक झालेली रक्कम सायबर पोलीस स्टेशन कडुन होल्ड करून तक्रादाराला परत करता येईल.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सारर्थक नेहेते, पो.उपनिरीक्षक भारत थिटे, पो.हवा स्नेहलाता ढवळे, वर्षा खंडाईत, नापोअं संगीता गावंडे, ममता सरोदे, सतीष राठोड, पोशि मृणाल राऊत, मनीष नेवारे यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**